# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सांगली, यांचे कार्यालय (उपचिटणीस शाखा)

**सांगली –मिरज रोड, विजयनगर, सांगली फोन नं. 0233/2600363 ई मेल- sanglirdc@gmail.com**

---

क्र.गृह-1/कार्या-6/पोल-1/अल्पसंख्याक/आरआर/ 516 /2020 दि.25 /03/2021

**प्रशिक्षणार्थींची निवड करण्यासाठी प्रसिध्द सूचना.**

सन 2020-21 मध्ये "पोलीस शिपाई भरती पूर्व परीक्षा प्रशिक्षण" योजनेअंतर्गत मुस्लिम, ख्रिश्चन, बौध, शीख, पारसी, जैन आणि ज्यू या अल्पसंख्यांक समाजातील इच्छुक उमेदवारांना शासनामार्फत विनामूल्य पोलीस शिपाई भरतीपूर्व परीक्षा प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पुढील मुद्दा क्र. 01 ते 07 ची पूर्तता करणा-या उमेदवारांनी **दि.05/04/2021 पर्यंत** पोहोच होतील असे खालील कागदपत्रांच्या झेरॉक्स जोडून जिल्हाधिकारी सांगली यांचे कार्यालयाकडे अर्ज सादर करावेत. अर्जावर उमेदवार यांचा संपूर्ण पता, ई मेल आय डी, संपर्क क्रमांक / Whatsapp Number नमुद करावा.

1) प्रशिक्षणार्थीचे वार्षिक कौटुबिंक उत्पन्न रु. 2.50 लक्ष (रुपये दोन लक्ष पन्नास हजार पेक्षा जास्त नसल्याचा पुरावा. (तहसिलदार यांचा दाखला)
2) उमेदवार अल्पसंख्यांक (मुस्लिम, ख्रिश्चन, बौध, शीख, पारसी, जैन आणि ज्यू) समाजातील असावा. (सक्षम प्राधिकारी यांचा दाखला)
3) उमेदवार हा 18 ते 28 या वयोगटातील असावा.
4) उमेदवाराची उँची पुरुष 165 सें.मी. व महिला 155 सें.मी. छाती पुरुष 79 सें.मी (फगवून 84 सें.मी) असावी
5) उमेदवार इयत्ता 12 वी उत्तीर्ण असावा.
6) उमेदवारानी शैक्षणिक आर्हता, आधार कार्ड इ. कागदपत्रांच्या सत्यप्रती अर्जासोबत देणे आवश्यक राहील.
7) उमेदवार शारीरीकदृष्ट्या निरोगी व सक्षम असावा.

मूळ कागदपत्रे तसेच उमेदवाराची शारीरीक पात्रता तपासणी करणेकामी या कार्यालयाकडून स्वतंत्रपणे कळविणेत येईल.

(डॉ. अभिजीत चौधरी)
**जिल्हादंडाधिकारी सांगली**

**प्रती,**

**जिल्हा माहिती अधिकारी सांगली.**

2/- यांना वरील प्रमाणे माहिती जिल्ह्यातील प्रमुख वर्तमानपत्रात बातमीस्वरुपात प्रसिध्द करणेत यावी.

2. एन आय सी शाखा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली – वरील माहिती सांगली जिल्ह्याच्या वेबसाईटवरती प्रसिध्द करावी.
3. **प्राचार्य, आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज**, कासेगाव, ता. वाळवा, जि. सांगली (कासेगाव शिक्षण संस्था, कासेगाव) - यांना सदर प्रशिक्षण देणेसाठी आपले संस्थेची निवड झाली असलेने, वरील माहिती, संस्थेमार्फत व्यापक स्वरुपात प्रसिध्द करावी